# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

घनकचरा व्यवस्थापन विभाग,
छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकिय इमारत,
5 वा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हिल लाईन, नागपूर – 01
website: www.nmcnagpur.gov.in

क्रमांक : एच.ओ./३५५/ पवैसे                                                  दिनांक :०५/०३/२०२४

## आदेश

जाहिरात क्रं. १०७२/पी.आर.दि.२१/०२/२०२४ अन्वये देण्यात आलेल्या जाहिरातीनुसार व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे दि. २७/०२/२०२४ रोजी प्रत्यक्ष मुलाखत घेवुन निवड करण्यात आलेल्या खालील उमेदवाराला कंत्राटी पध्दतीवर प्रथम:त सहा. पशुवैद्यक यांना ६ महिन्याकरिता रू. ४०,०००/- एकत्रित मासिक परिश्रमीकावर खालील अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात येत आहे.

| अ. क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | संवर्ग | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. आशिषकुमार राधेश्याम जसाईवाल | सहा. पशुवैद्यक | खुला | घनकचरा व्यवस्थापन विभाग |

## अटी व शर्ती :-

१) घनकचरा व्यवस्थापन विभाग (पशुवैद्यकिय सेवा कक्ष) अंतर्गत येणारी कामे, जसे : शहरातील जख्मी/आजारी प्राण्यांवर उपचार, शस्त्रक्रिया, जनावरांची तपासणी तथा मनपा अधिकृत कत्तलखाण्यामध्ये येणाऱ्या जनावरांची तपासणी करणे तसेच कत्तलखाण्यातील कर्मचारी यांच्यावर देखरेख नियंत्रण ठेवणे. वरिष्ठांच्या निर्देशानुसार इतर कामे करावी लागेल.

२) प्रत्येक महिण्याचे १० तारखेचे आत कामाचा लेखाजोखा मुख्यालयाला सादर करणे.

३) पशुनिवारा केंद्र येथे येणाऱ्या सर्व प्राण्यांची नोंद घेवुन दस्तावेजाचे जतन करणे.

४) महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाद्वारे सोपविण्यात आलेली कामे करण्यासाठी संबंधितांना स्व:ताचे वाहन वापरावे लागेल. वेगळा वाहन भत्ता मिळणार नाही, तसेच स्व:ताच्या खर्चाने मोबाईल नेहमी चालू ठेवावा लागेल.

५) काम समाधानकारक नसल्यास २४ तासाची नोटीस देवुन सेवा संपुष्टात आणु शकतील.

६) पुर्व परवानगी शिवाय ७ दिवसापेक्षा जास्त कालावधी गैरहजर राहिल्यास सेवा समाप्त करण्यात येईल व त्यावर उमेदवारांचे उजर मान्य केला जाणार नाही.

७) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती ६ महीन्याच्या कालावधी करीता राहील.

८) कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास मनपाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

९) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील, ज्यावर कोणतेही उजर मान्य केला जाणार नाही.

१०) कंत्राटी पध्दतीवरील अधिकारी/कर्मचारी यांनी प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीच्या परिश्रमिकापोटी होणारा खर्च घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या आस्थापनेवरून काढण्यात येईल.

१२) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील.

१३) नियुक्ती नंतर सेवा सोडून जावयाचे असल्यास उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, म.न.पा. यांना एक महिना अगोदर लेखी सुचना द्यावी लागेल.

१४)वरिल उमेदवारांना रूजू होतांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ नुसार हमीपत्र/बंधपत्र रू. १००/- च्या स्टॅम्प पेपर वर द्यावे लागेल.

१५) वरिल अनु क्र. १ ते १३ अटी मान्य असल्यास नियुक्तीच्या पदावर रूजू होण्याबाबतचे प्रतिवेदन उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन यांना ०७ दिवसाचे आत सादर करावे.

(मा. आयुक्त यांचे दिनांक ०४/०३/२०२४ चे मंजुरीन्वये)

(डॉ. गजेंद्र महल्ले)
उपायुक्त तथा संचालक
घनकचरा व्यवस्थापन विभाग,
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :-

१. मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे माहीतीस्तव सविनय सादर.
२. मा. अति.आयुक्त, नागपुर महानगरपालिका, नागपुर.
३. उपायुक्त, सा.प्र.वि., नागपुर महानगरपालिका, नागपुर.
४. प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, नागपुर महानगरपालिका, नागपुर.
५. मुख्य लेखा परिक्षक, नागपुर महानगरपालिका, नागपुर.
६. विशेष कार्यासन अधिकारी, नागपुर महानगरपालिका, नागपुर.
७. पशुचिकित्सा अधिकारी, नागपुर महानगरपालिका, नागपुर.
८. देयक लिपिक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, म.न.पा., नागपुर.
९. आदेशातील नमुद उमेदवार ..........................................................